Vol 7 Issue 2 Nov 2017
ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2017

# भारताचे बदलते परराष्ट्र धोरण



प्रा. डॉ. अनंत मदन आवटी
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, श्री.व्यंकटेश महाविद्यालय,
देऊळगावराजा , जि.बुलडाणा .

## प्रस्तावना :

भारतास 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीला प्रारंभ झाला. भौगोलिक घटक, आर्थिक घटक, ऐतिहासिक परंपरेचा व सांस्कृतिक संबंधांचा विचार परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना झाला आहे. भारताचे प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी सौहार्दाचे संबंध होते. मात्र, ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांच्या वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या इतर देशांशी असणाऱ्या संबंधामध्ये बदल झाला. ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील धुरिणांनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या तत्त्वांधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यानंतर पहिले पंतप्रधान व परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पं. नेहरू यांनी ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणातील कटू अनुभवापासून बोध घेत देशाचे परराष्ट्र धोरण आखले. अलिप्ततावाद, वसाहतवाद आणि साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेष विरोध, जागतिक शांतता, प्रादेशिक सहकार्य, निःशस्त्रीकरणाला पाठिंबा ही भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे आहेत.

## शीतयुध्दकालीन परराष्ट्र धोरण :.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1947 ते 1990 या काळातील परराष्ट्र धोरणाला भारताचे नेहरूवादी परराष्ट्र धोरण असे म्हटले जाते. कारण जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून नेहरूंना ओळखले जाते. केवळ सीमारेषा संरक्षित करून भारताचे प्रश्न सुटणार नाहीत तर त्यासाठी भारताचा आर्थिक विकासदेखील होणे आवश्यक आहे, असे नेहरूंचे मत होते. या परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रीय सुरक्षेबरोबर मानवी सुरक्षेला (ह्युमन सिक्युरिटी) तेवढे महत्त्व होते. त्यांची सुरक्षेची संकल्पना ही केवळ बाह्यसुरक्षेशी निगडित नव्हती, तर अंतर्गत सुरक्षेलाही तेवढेच महत्त्व होते. देशाच्या सीमारेषा संरक्षित करण्याबरोबरच सामान्य माणसाच्या अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करणे हेदेखील परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे नेहरूंचे मानणे होते (देवळाणकर, 2014:9).

स्वातंत्र्यानंतर पाकिस्तान अमेरिकाप्रणित लष्करी गटात सामील झाला. भारताने कोणत्याही गटाशी आपली बांधिलकी न दाखवता अलिप्ततावादाचा पुरस्कार केला. भारताच्या या धोरणाचा पुढे लाभही झाला. 90च्या दशकामध्ये सोव्हिएत रशियाचे पतन, शीतयुद्धाची समाप्ती झाली. याचवेळी भारत आर्थिक संकटातून वाटचाल करत होता. परिणामी, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माध्यमातून अमेरिकेच्या संपर्कात यावे लागले. यानंतर भारताने एलपीजी मॉडेलचा अंगीकार करून अर्थव्यवस्था खुली केली. या घटनेमुळे भारताचे परराष्ट्र धोरण व्यूहात्मक बाबींकडून भू. आर्थिक बाबींकडे झुकले. या संरचनात्मक बदलामुळे भारताची 'फॉरेन एड'कडून 'एफडीआय'कडे वाटचाल सुरू झाली. याचवेळी भारताने 'पूर्वेकडे पाहा' धोरणाचा अंगीकार केला. यावेळी पूर्व आशियायी देशांमध्ये वेगाने आर्थिक विकास घडून येत होता. यामुळे पर्यटन, व्यापार आणि आर्थिक सहकार्य यांना चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला (चौगुले, 2016).

भारताचा आर्थिक विकास, वैश्विकीकरणामुळे वाढणारे आंतरराष्ट्रीय संबंध, वाढणारे संरक्षण दल आणि वाढता संरक्षण खर्च, व्यापक आकारामुळे हवामानबदलासारख्या विषयांवर पडणारा प्रभाव आणि भारताच्या बाजारपेठेत इतर राष्ट्रांना असलेले स्वारस्य यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण अधिकाधिक व्यापक, किचकट आणि बहुआयामी झाले आहे.

## शीतयुध्दोत्तरकालीन परराष्ट्र धोरण :.

सोव्हिएत संघराज्याच्या पतनानंतर राजकीय, आर्थिक आणि अन्य बाबींत कायम पाठीशी उभा राहणारा भारताचा खात्रीशीर मित्र कमकुवत झाला होता. आखाती देशांतील अस्थैर्यामुळे खनिज तेल.आयातीवर आधारित आपल्या अर्थव्यवस्थेला धक्का बसला होता. शीतयुद्धाच्या काळात भारताने अमेरिका आणि सोव्हिएत युनियन या दोन्ही गटांमध्ये समाविष्ट न होता दोघांपासूनही समान अंतर राखत (त्यातही काहीसे रशियाकडे झुकत) इजिप्त आणि युगोस्लाव्हियाच्या सहकार्याने अलिप्ततावादी देशांची चळवळ (नॉन अलाइन्ड मुव्हमेंट . नाम) उभी केली होती. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर त्याची फारशी प्रस्तुतता उरली नव्हती. भारत आणि पाकिस्तानमधील वितुष्टामुळे दक्षिण आशियातील देशांची 'सार्क' (साऊथ एशियन असोसिएशन फॉर रीजनल को.ऑपरेशन) ही संघटना फारशी फलद्रूप होत नव्हती. (दिवाण, 2015)

साधारणतः 1990 च्या सुमारास जेव्हा भारत

जागतिकीकरणाच्या दिशेने वाटचाल करू लागला तेव्हाच भारताची दक्षिण आशिया क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करायला सुरुवात झाली. मग 1988 साली भारताने आपल्या युद्धनौका मालदीवला पाठवून तिथे होत असलेला लष्करी उठाव उधळून लावणे असेल, किंवा 1990 च्या पूर्वार्धात श्रीलंकेला तामिळी अतिरेक्यांविरुद्ध केलेली मदत असेल; ही सर्व भारताचे कार्यक्षेत्र विस्तारत असल्याची लक्षणे होती. यानंतर पी. व्ही. नरसिंहराव आणि आय के गुजराल यांसारख्या पंतप्रधानांनी भारतीय परराष्ट्र धोरणाला एक नवी दिशा दिली. परंतु, याच काळात भारताच्या या प्रतिमेविषयी शेजारी राष्ट्रांच्या मनात एक धास्ती निर्माण होऊ लागली. प्रदेशातील सर्वात मोठा देश म्हणून भारत दांडगाई करत आहे अशी काहीशी प्रतिमा सर्वत्र निर्माण झाली. यातच 1998 मध्ये भारत आणि पाकिस्तान ह्या दोन्ही शत्रू राष्ट्रांनी अण्वस्त्रेही निर्माण केली होती. प्रादेशिक शांततेला धोका तर निर्माण होत नाही ना, अशी भीती 1999 च्या कारगिल युद्धाने निर्माण केली.

तोवर जागतिक राजकारणात भू.राजकीय आणि लष्करी घटक प्रभावी होते. आता त्याची जागा अर्थकारणाने घेतली होती. जागतिकीकरणाने वेग घेतला असला तरीही नव्या व्यवस्थेत विभागीय समूहांनी पुन्हा उचल खाल्ली होती. अमेरिकेच्या आर्थिक ताकदीला उत्तर देण्यास जर्मनीच्या नेतृत्वाखालील युरोपीय महासंघ उभारी घेत होता. चीनची वेगाने आर्थिक प्रगती सुरू होती. आग्नेय आणि पूर्व आशियातील सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, दक्षिण कोरिया हे देश (एशियन टायगर्स म्हणून ओळखले गेलेले) आर्थिक आणि औद्योगिक क्षितिजावर चांगलेच तळपत होते. अशा परिस्थितीत जागतिक राजकारणात बाजूला पडण्याची चिंता भारताला सतावत असतानाच, सांस्कृतिक आणि भौगोलिक जवळीक असलेले पूर्व आणि आग्नेय आशियातील (ईस्ट अँड साऊथ.ईस्ट एशिया) देश जवळचे वाटले आणि बदलत्या जागतिक व्यवस्थेतील अपरिहार्यतेतून भारताचे पूर्वाभिमुख परराष्ट्र धोरण (लुक ईस्ट पॉलिसी) साकारले (दिवाण, 2015).

देशाची आर्थिक, सरंक्षण आणि वाणिज्य क्षमता ही परराष्ट्र धोरणावर अवलंबून असते. देशाच्या संरक्षणात आणि विकासात याचा सिंहाचा वाटा असतो. भारत स्वतंत्र झाल्यापासून परराष्ट्र धोरणाची प्रत्यक्षात कृती नगण्य होती. भारत देश आणि भारतीय नागरिक हा कायम इतर देशांसमोर मांडलिकासारखा वागत होता. स्वत्व आणि आत्मप्रतिष्ठा हरवलेला भारत देश म्हणजे इतर देशांच्या दृष्टीने लक्ष न देण्यासारखा देश वाटत होता. इतर देशांना भारताची कळ काढणे, अपमान करणे किंवा सोयीपूरते वापरणे इतकीच उपयोगिता वाटायची. पण आता मात्र काळ बदलला आहे. नरेंद्र मोदी सरकार च्या परराष्ट्र धोरणामुळे आल्यापासून इतर देशांना भारताविषयी भूमिका बदलणे भाग पडत आहे. याला अमेरिका, चिनचाही अपवाद नाही. मोदी आपल्या दमदार परराष्ट्र धोरणांनी देशाच्या गंगाजळीत मोठी भर घालत आहेत तर दुसरीकडे सामरिक नितीही उत्तमपणे राबवत आहे.

### *मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण :*

सत्तेत आल्यापासून मोदींनी परराष्ट्र धोरणाला विशेष महत्त्व दिले. त्यांचा कल पाश्चिमात्य राष्ट्रांकडे झुकलेला दिसतो तसेच शेजारील देशांशी संबंधांना खूप महत्त्व दिले आहे. अतिशय धोरणीपणे आंतराष्ट्रीय नाती जुळवायला आणि संवर्धित करायला सुरुवात केली. सत्तेत आल्यापासून मोदींनी परराष्ट्र धोरणाला विशेष महत्त्व दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकार स्थापन झाल्यापासूनच शेजाऱ्यांबरोबरच अनेक महत्त्वाच्या देशांशी संबंध वाढविण्यावर जास्त भर दिला. आंतराष्ट्रीय स्तरावर भारताचे अनेक मित्र असावेत हा त्यामागचा प्रयत्न होता. पंतप्रधानपदाच्या शपथविधीसाठी शेजारी देशांच्या प्रमुखांना निमंत्रित करून मोदींनी आपल्या मैत्री मोहिमेची सुरुवात केली. 2014 पासून नरेंद्र मोदी यांनी 49 देशांना भेटी दिल्या तर किमान 80 देशांचे नेते दिल्लीत येऊन गेले. शेजारी राष्ट्रांशी तसेच इतर देशांशी असलेले व्यापारी संबंध किंवा बलशाली राष्ट्राशी संबंध आणि विकसनशील राष्ट्राशी नाते सुधारण्यासाठी मोदींनी प्रयत्न केले. मोदींनी अतिशय धोरणीपणे ही आंतराष्ट्रीय नाती जुळवायला आणि संवर्धित करायला सुरुवात केली आहे. देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणांच्या व्यापक एकीकरणाचा दृष्टिकोन दिसत आहे. उदा. मेक इन इंडिया, पंतप्रधान परदेश दौऱ्यामध्ये योग, भारतात रुजलेली बौद्ध व इस्लामिक संस्कृतीची परंपरा यांवर भर देतात. यावरून 'सॉफ्ट पॉवर' वाढवण्याकडे कल दिसून येतो. पूर्वीच्या 'लुक ईस्ट पॉलिसी'ऐवजी 'अ‍ॅक्ट ईस्ट' धोरण व 'लूक वेस्ट' धोरणाचे सूतोवाच केले आहे. भारत हा जगातील सर्वाधिक ऊर्जा वापर करणाऱ्या देशांपकी एक आहे. परिणामी, 'ऊर्जा सुरक्षा' हा मुद्दा भारताच्या परराष्ट्र धोरणात महत्त्वाचा बनला आहे. सध्याच्या परराष्ट्र धोरणामध्ये सातत्याबरोबर बदलांची काही लक्षणे दिसत आहेत. यामध्ये व्यापाराबरोबर सुरक्षा, संस्कृती, भू.राजकीय व भू.सामरिक स्वरूपाचे विषय अतिशय महत्त्वाचे आहेत (चौगुले, 2016). मोदींनी अमेरिका, रशिया, युरोप आणि आखाती देश या गटांच्या पलीकडे जाऊन व्यापक भूमिका घेतली.

संयुक्त राष्ट्रे, ईस्ट एशिया समिट, जी.20 गट, ब्रिक्स संघटना, शांघाय को.ऑपरेशन ऑर्गनायझेशन, इंडिया.आफ्रिका समिट अशा व्यासपीठांवरून भारताच्या हितसंबंधांना पुढे रेटण्याचा प्रयत्न केला.

जगभरातून भारताच्या प्रतिमा संवर्धनाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. मोदी यांच्या राजनयाचे सर्वात मोठे यश म्हणजे राष्ट्रीय हित आणि वास्तवावर आधारित परराष्ट्र नीती बनविण्याच्या मानसिकतेला अधिक प्राधान्य दिले गेले आहे. बहुपक्षीय जागतिक व्यासपीठांवर भारताची भूमिका अधिक आत्मविश्वासाने मांडण्यात येत आहे. भारताच्या न्याय्य हक्काच्या मागण्यांसाठी जागतिक समुदायापुढे हात न पसरता विकसित देशांना भारताच्या अर्थव्यवस्थेत संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मोदी यांनी दिले. देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणांच्या व्यापक एकीकरणाचा दृष्टिकोन दिसत आहे. महत्त्वपूर्ण बदल म्हणजे जागतिक स्तरावर राजनय आणि आर्थिक विकास यांची सांगड अधिक अचूकतेने घालण्यात मोदी सरकारने पुढाकार घेतला आहे. उदा. मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्किल इंडिया यांसारख्या आकर्षक योजनांसाठी अनेक देशांनी प्रत्यक्ष गुंतवणुकीला सुरुवात केली आहे (चौगुले, 2016). जगातील पाच महासत्ता आणि संभाव्य मोठे कॉर्पोरेट गुंतवणूकदार यांच्यासोबत संवादाच्या प्रक्रियेला गती दिली आहे. उपरोल्लेखित सौरऊर्जा आघाडीद्वारे ऊर्जा सुरक्षिततेसाठी वाटचाल सुरू केली आहे. तसेच अणुऊर्जेबाबतीत अमेरिकेसोबत निर्माण झालेला तिढा सोडवण्यात मोदी यांना यश आले आणि येत्या अमेरिका दौऱ्यात (जून 7—8, 2016) वेस्टिंग हाऊस आणि भारताच्या 'न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' दरम्यान करार होणे अपेक्षित आहे. यामुळे भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राला मोठा दिलासा मिळेल. रशियाने तामिळनाडू येथील कुंडकुलम पकल्पात रशियन बनावटीच्या अणू संयंत्राच्या निर्मितीत स्थानिक स्तरावरील भारतीय कंपन्यांच्या सहभागाला मान्यता दिली आहे. (भावठाणकर, 2016 ) सध्याच्या परराष्ट्र धोरणामध्ये सातत्याबरोबर बदलांची काही लक्षणे दिसत आहेत. यामध्ये व्यापाराबरोबर सुरक्षा, संस्कृती, भू.राजकीय व भू.

सामरिक स्वरूपाचे विषय अतिशय महत्त्वाचे आहेत.

### पाकिस्तानसोबत संबंध :

पाकिस्तानशी पुन्हा चर्चा सुरू व्हावी यासाठी मोदींनी पुढाकार घेतला. पाकचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोदी अचानक पाकिस्तानमध्ये, पण ही बर्थ डे डिप्लोमसी निरुपयोगी ठरली. पाकने पठाणकोटसारखे दहशतवादी हल्ले घडवले, कुलभूषण जाधव यांना पाकिस्तानी न्यायालयाने हेरगिरीच्या आरोपावरून फाशीची शिक्षा ठोठावल्यानंतर हे संबंध आणखी ताणले. मोदींनी 15 ऑगस्टचे भाषण संपवताना विषयपत्रिकेवर बलुचिस्तानचा विषय आणला. तेव्हापासून बलुचिस्तानचा मुद्दा जगात पुन्हा पेटला आणि त्याचा पाकिस्तानला धसका आहे. त्यानंतर भारताने पाकिस्तानात घुसून सर्जिकल स्ट्राईक करून दाखवला. त्याची एक चुणूक आधी ईशान्य भारतात दाखवली होती. आपल्या मणिपूरमधल्या लष्करी तळावर नागा हल्लेखोरांनी हल्ला केला तेव्हा म्यानमारच्या सरकारच्या सहकार्याने म्यानमारमध्ये घुसून एनएससीएनचे तळ उद्ध्वस्त केले होते.

गेल्या तीन वर्षांमध्ये भारताने पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर एकटे पाडण्यात यश मिळवले आहे. आधी मैत्रीचा हात पुढे केला; पण पाकिस्तानच्या भारतातील दहशतवादी कारवाया सुरूच राहिल्या.

### चीनसोबत संबंध :

चीनशीही मैत्रीपूर्ण चर्चा झाल्या. परस्पर राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांनी एकमेकांच्या देशांना भेटी दिल्या. आजही मॅकमोहन रेषा चीनला मान्य नाही, अरुणाचल पदेशावर चीन अजूनही दावा सांगत आहे, आंतरराष्ट्रीय राजकारणात चीन भारतविरोधी भूमिका घेत आहे, आण्विक पुरवठादार समूहाचा सदस्य होण्यामध्ये भारताच्या मार्गात आडकाठी आणत आहे, हाफिज सईद, मौलाना अजहर मसूद यांना दहशतवादी घोषित करण्यातही चीन अडवणूक करत आहे; पण तरीही ते विषय बाजूला ठेवून चीनशी व्यापार, शैक्षिणक देवाणघेवाण सुरू ठेवली आहे. हे करत असताना गप्प बसून चीनचे सर्व ऐकून घेत आहोत, असे नाही. व्हिएतनामशीही भारताचे संबंध सुधारले आहेत. या देशाच्या सागरी रेषेमधील खोल समुद्रामध्ये तेलउत्खननाचे काम भारताला मिळाले आहे. हा करार, चीनला रुचला नाही. चीनने भारताला धमकावले. त्यावर भारताने चीनला खडसावताना सांगितले की, व्हिएतनामशी आमचा सार्वभौम करार आहे. तुमचा संबंध नाही. दलाई लामांबाबतही 1959 नंतर पहिल्यांदा अधिकृत पाऊल उचलण्यात आले. भारत सरकारचा अधिकृत, परराष्ट्र सेवेतील अधिकारी दलाई लामांचे सरकार आणि भारत सरकार यांच्यामध्ये लायझन करायला पाठवण्यात आला. त्यानंतर दलाई लामांची अरुणाचलला भेट झाली. त्यावर चीनने नोंदवलेला निषेध, भारताचे प्रत्युत्तर आणि त्यानंतर आपल्या राष्ट्रपतींची भेट हे आम्ही चीनसमोर झुकणार नाही, पण भारत हे स्वतःचे बळ असलेले राष्ट्र म्हणूनच वागेल असे धोरण होते.

दक्षिण आशियातील वर्चस्व राखण्यासाठी पाकला हाताशी धरून भारताला शह देण्याचे चीनने डावपेच आखले. पाकिस्तानमधील ग्वादर बंदराच्या विकासाद्वारे चीनने इराणच्या आखाताच्या तोंडाशी भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. इराणकडून चाबहार बंदराच्या विकासाचे हक्क मिळवणे, तेथून होणारा तेलपुरवठा अबाधित राखणे यातून भारताने हे प्रयत्न हाणून पाडले. चीनच्या स्ट्रिंग ऑफ पर्ल्स आणि सी सिल्क रोड प्रकल्पांना कटशह देण्यासाठी भारताचा मौसम प्रकल्प कार्यान्वित करण्यास प्राधान्य दिले. गेल्या तीन महिन्यांपासून भारत आणि चीनमधील संबंध डोकलाम वादामुळे ताणले गेले होते. दोन्हीकडचे सैनिक आमनेसामने उभे ठाकले होते. वेगवेगळ्या माध्यमातून डरकाळ्या फोडून चीन भारताला घाबरवण्याचा पयत्न करत होता. युद्धाच्या धमक्या देत होता. पण, भारत जराही डगमगला नाही. उलट, अत्यंत संयमी भूमिका घेऊन त्यांनी चीनचीच कोंडी केली. आधी सैन्य मागे घेऊ, मग चर्चेतून हा वाद सोडवू, या पवित्र्यावर ते ठाम राहिले. डोकलाममधून आम्ही मागे हटणार नाही. हा भूभाग आमचाच आहे. तुमचे सैनिक मागे हटले नाहीत, तर 1962 पेक्षा गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा धमक्या देणाऱ्या चीनला अखेर भारताच्या आक्रमक भूमिकेपुढे माघार घ्यावी लागली. चीन आणि भारताने सामंजस्याने डोकलाममधून आपापलं सैन्य मागे घेण्याचा निर्णय घेतला असून हा भारताच्या कूटनीतीचा मोठा विजय मानला गेला. डोकलामचा वाद लवकर मिटल्यास काय फायदे होतील आणि न मिटल्यास काय नुकसान होईल, हे चीनला पटवून देण्यात भारत यशस्वी झाला. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सदस्यत्व भारताला न मिळावे यासाठी चीनाचा खोडा कायम आहे.

### ॲक्ट ईस्ट धोरण :

पंतप्रधानपदाच्या शपथविधीसाठी शेजारी देशांच्या प्रमुखांना निमंत्रित करून मोदीं या मोहिमेची सुरुवात केली. मोदी सरकारने 'नेबरहूड फर्स्ट' धोरणावर भर दिला आहे. बांगलादेश, भूतान आणि श्रीलंका यांच्याशी संबंध दृढ झाले आहेत. मालदीवशी असलेले संबंधदेखील पूर्ववत होत आहेत. जागतिक सत्ता बनण्यासाठी आपल्या शेजारी देशांशी सलोख्याचे संबंध ठेवणे पूर्वअट असते. (भावठाणकर, 2016)

हिंदी महासागराचे जागतिक अर्थ आणि राजकारणातील स्थान ध्यानात ठेवून मोदी यांनी महासागरातील अनेक देशांना भेटी दिल्या. याच संदर्भात 'ॲक्ट ईस्ट'चे महत्त्व अधोरेखित करावे लागेल. पूर्व आणि आग्नेय आशियातील देशांशी संबंध सुधारण्यासाठी पूर्वीच्या सरकारच्या लुक ईस्ट पॉलिसीच्या एक पाऊल पुढे जाऊन ॲक्ट ईस्ट धोरण राबविले. ईशान्येकडील राज्यांतील दहशतवाद्यांचा बीमोड करण्यात म्यानमारबरोबरचा सहकार्य करार आणि संबंधांचा फायदा जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आणि फिलिपिन्स या देशांशी सहकार्य वाढवण्याचे प्रयत्न केले.

### अमेरिकेशी जवळीक :

सप्टेंबर 2014मध्ये त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेनिमित्त अमेरिकेचा ऐतिहासिक दौरा केला, तर प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून ओबामांना बोलावून अमेरिकेशी चांगले संबंध हे सरकार किती गांभीर्याने घेत आहे हे दाखवून दिले. आजवर प्रजासत्ताक

दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून आपण पाकिस्तानच्या प्रमुखांना दोन वेळा, तसेच धार्मिक कट्टरतावादी देशाच्या राजांना तसेच हुकूमशहांना बोलावले, पण जगातील सर्वात प्रथम लोकशाही देश असलेल्या अमेरिकेला मान देण्याची आपली तयारी नव्हती. विषय फक्त दौऱ्यांचा किंवा मानसन्मानाचा नाही. अमेरिकेशी झालेल्या अणुकराराचा गुंता सोडवून तो व्यवहारात येण्यासाठी मोदी सरकारने राष्ट्रीय हित धोक्यात न आणता लवचीकता दाखवली. वादंगाच्या सर्व मुद्दयांवर . उदा. पर्यावरणातील बदल, कृषी क्षेत्रातील अनुदान, व्हिसा, व्यापार इ.वर खुलेपणाने चर्चा सुरू झाली. आज अमेरिका रशियाला मागे टाकून संरक्षण क्षेत्रात भारताचा सर्वात मोठा भागीदार झाला आहे. अमेरिकेशी संबंध सुधारण्यात तेथील भारतीयांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे, हे ओळखून मोदींनी आपल्या दौऱ्यात त्यांच्याशी संवाद साधण्यावर भर दिला.

सप्टेंबर 2014 मध्ये मोदींनी संयुक्त राष्ट्रातील महासभेसाठी न्यूयॉर्कचा दौरा केला होता. या दौयात मोदींनी ओबामांची भेट घेतली होती. अणू शिखर परिषदेसाठी 2016 मध्ये मोदींनी तिसऱ्यांदा अमेरिकेचा दौरा केला. ओबामांच्या विनंतीनंतर 2016 मध्ये मोदी पुन्हा अमेरिकेत गेले. त्यांनी अमेरिकेच्या कॉंग्रेससमोर भाषण दिले. भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळयाला अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना निमंत्रित करण्याची मोदींची कूटनीती कमालीची यशस्वी ठरली. तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांचा हा भारत दौरा ऐतिहासिक ठरला.

मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा प्रभाव कसा वाढवता येईल यासाठी प्रयत्न करणे. भारताच्या शेजारील राष्ट्रांशी संबंध विकसित करणे. दहशतवाद पसरविणाऱ्या देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर अलग पाडणे. दक्षिणपूर्व आशियाई देशांबरोबर संबंध मजबूत करणे. मोदी सरकारच्या काळात परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया अधिक लवचीक, व्यवहार्य आणि आक्रमक झाली आहे. अर्थकारण हे नव्या परराष्ट्र धोरणाचे एक वैशिष्टय बनले आहे. आदर्शवादाकडून वास्तववादाकडे परराष्ट्र धोरणाची आखणी होत असल्याचे निदर्शनास येते.

### *संदर्भ सूची :*

2017, मोदी सरकारची तीन वर्षे : परराष्ट्र धोरण, 22 मे, 2017, दै. महाराष्ट्र टाईम्स
चौगुले, प्रवीण, 2016, भारताचे परराष्ट्र धोरण 2 मे, 2016, दै. लोकसत्ता
दिवाण, सचिन, 2015, एका धोरणाची 'पूर्वपीठिकाए 1 ऑगस्ट 2015, दै. लोकसत्ता
देवळाणकर, शैलेंद्र, 2014, भारत आणि जग, पुणे, सकाळ प्रकाशन.
संपादकीय, 2017, नव्या भारताच्या परराष्ट्र धोरणाची नवी व्हिजन आणि नवी दिशा 15 सप्टेंबर 2017, सा. स्वतंत्र नागरिक
भावठाणकर, अनिकेत, 2016, परराष्ट्र नीतीची दोन वर्षे, 27 मे, 2016, दै. लोकसत्ता



*प्रा.डॉ. अनंत मदन आवटी,*
*प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, श्री.व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगावराजा , जि.बुलडाणा .*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com